दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शुक्रवार, 20 मार्च 2026 | अंक क्र. 300 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com













## दिव्यांग बांधवांना 5% राखीव निधीतून अर्थसहाय्य वितरीत

# घरकुलांसह वैयक्तिक लाभाच्या योजनांची लाभार्थी संख्या आणि विकास कामे दुपटीने करण्यासाठी प्रयत्नशील : धनंजय मुंडे

## प्रधानमंत्री आवास योजनेतून 677 घरकुल लाभार्थींना पहिल्या हप्त्याची प्रत्येकी एक लाख रुपये रक्कम धनंजय मुंडे यांच्या हस्ते वितरीत

**परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)**

परळी वैद्यनाथ शहर विकासाच्या वाटेवर असून मागील काही दिवसांत मी अत्यंत कठीण परिस्थितीत असताना परळीतील नागरिकांनी महायुतीच्या पाठीशी भक्कम ताकद उभी करत नगर परिषद आमच्या ताब्यात दिली. त्यामुळे विविध योजनेतील घरकुले, अन्य वैयक्तिक लाभाच्या योजनामधील लाभार्थी संख्या आणि सार्वजनिक हिताच्या विकासकामांचा वेग आता दुप्पट करण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांच्या मदतीने अधिक व्यापक काम करणार असल्याचे मत माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी परळी येथे बोलताना व्यक्त केले.

परळी वैद्यनाथ नगर परिषदेच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत मंजूर 677 घरकुल लाभार्थींना पहिल्या हप्त्याची प्रत्येकी एक लाख रुपये रक्कमेचे धनादेश आज धनंजय मुंडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत स्व. गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर येथे आयोजित कार्यक्रमात वितरीत करण्यात आले.

यावेळी नगर परिषद अंतर्गत रमाई आवास योजनेतून आणखी 200 घरकुले मंजूर करण्यात आली असून त्याचे प्रस्ताव व अन्य बाबी तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना धनंजय मुंडे यांनी संबंधित अधिकारी व नगरसेवकांना दिल्या. या कार्यक्रमा प्रसंगी 565 दिव्यांग बांधवांना नगर परिषदेच्या 5% राखीव निधीतून आर्थिक मदतीचेही वितरण श्री मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. मागील काही महिन्यात राज्यातील अनेक मोठ्या नेत्यांनी मला ठरवून बदनाम केले, मात्र माझी परळीची जनता ठामपणे माझ्या पाठीशी उभी आहे, याचा मला अभिमान व आनंद वाटतो आणि तितकीच जबाबदारीची जाणीवही होते, असेही धनंजय मुंडे यांनी नमूद केले. याप्रसंगी नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, अजय मुंडे, दिव्यांग कल्याण महामंडळाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे, बाजीराव भैय्या धर्माधिकारी, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, राजा खान, प्रा. पवन मुंडे, रवींद्र गित्ते, राजाभाऊ पोळ, माणिकभाऊ फड, श्रीकृष्ण कराड यांच्या सह विविध प्रभागातील नगरसेवक, नगर परिषद मुख्याधिकारी, अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# ईद-उल-फित्र निमित्त शहरात विद्युत रोषणाई करावी : शेख शरीफ यांची मागणी

**परळी / (प्रतिनिधी)**

ईद-उल-फित्र सणाच्या पार्श्वभूमीवर शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण होत असताना, नागरिकांच्या सोयीसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी पुढे येत आहे. शहरातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व माजी नगरसेवक शेख शरीफ यांनी शहरातील प्रमुख चौकांसह सर्व भागांमध्ये स्वच्छता आणि सुशोभीकरण करण्याची मागणी केली आहे.

शेख शरीफ यांनी सांगितले की, शहराच्या मध्यवर्ती भागातील राणी लक्ष्मीबाई टावर चौक आणि मौलाना अबुल कलाम आझाद चौक येथे नगरपरिषद प्रशासनाने आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात यावी, जेणेकरून सणाचा उत्साह अधिक वाढेल आणि शहराचे सौंदर्य खुलून दिसेल. तसेच, शहरातील विविध प्रभागांमध्ये ज्या ठिकाणी अस्वच्छता आहे. त्या ठिकाणी तातडीने स्वच्छता मोहीम राबवावी. नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी महानगरपालिकेने विशेष लक्ष द्यावे, असेही त्यांनी नमूद केले. याशिवाय, ईदच्या निमित्ताने कब्रस्तान परिसरात स्वच्छता व सुशोभीकरण करण्यात यावे, जेणेकरून नागरिकांना भेट देताना सुसज्ज व स्वच्छ वातावरण अनुभवता येईल, अशीही मागणी करण्यात आली आहे. एकूणच, ईद-उल-फित्र सण आनंदात आणि स्वच्छ वातावरणात साजरा व्हावा, यासाठी प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत




# ना. पंकजाताई मुंडे यांनी रामटेक निवासस्थानी गुढी उभारुन केले मराठी नववर्षाचे स्वागत

## जनतेच्या सुख-समृध्दी अन् सुरक्षेसाठी केली प्रार्थना

**मुंबई प्रतिनिधी**

राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या रामटेक या शासकीय निवासस्थानी आज गुढी पाडवा सण उत्साहात साजरा झाला. ना. पंकजाताईंनी गुढी उभारून मराठी नव-वर्षाचे उत्साहात स्वागत केले. पाडव्याच्या शुभेच्छा देतानाच त्यांनी राज्यातील व देशातील जनतेच्या सुख-समृध्दी आणि सुरक्षेसाठी ईश्वराकडे प्रार्थना केली. चैत्र मासारंभ अर्थात मराठी नवीन वर्षाचा आजचा पहिला दिवस, सर्वत्र गुढी पाडवा म्हणून उत्साहात साजरा झाला. ना. पंकजाताई मुंडे यांनी रामटेक या शासकीय निवासस्थानी विधीवत पूजनाने चैतन्य अन् मांगल्याची गुढी उभारून मराठी नववर्षाचे स्वागत केले.



### जनतेच्या सुरक्षा अन् प्रगतीसाठी केली प्रार्थना..

**गुढी पाडव्यानिमित्त जनतेला शुभेच्छा देताना त्या म्हणाल्या, 'महाराष्ट्रातील सर्व जनतेला खास करून माझ्या लाडक्या बहिणींना हे वर्ष सुख-समृध्दी, आनंदाचं, समाधानचं आणि उत्तम आरोग्याचं जावो. जगामध्ये आज जे काही चाललंय ते पाहिल्यानंतर मी देवीच्या चरणी,देवाच्या चरणी हीच प्रार्थना करते की, हे वर्ष माझ्या महाराष्ट्राला, माझ्या भारत देशाला सुख-समृध्दी व सुरक्षिततेचे जावो. प्रत्येक नागरिक हा सुरक्षित राहो, समृध्द राहो आणि माझ्या देशाने जगदगुरू होण्याच्या वाटचालीकडे जलदगतीने प्रवास करावा' अशा शब्दांत ना. पंकजाताईंनी नागरिकांना पाडव्याच्या शुभकामना व्यक्त केल्या.**

# पाडव्याच्या दिवशी शंभू महादेवाच्या वाघाच्या काठीचा व कावडीचा मिरवणूक उत्सव थाटात संपन्न

**परळी प्रतिनिधी**

परळी-पंचम ज्योर्तिलिंग स्वयंभू प्रभु वैद्यनाथाच्या परळी नगरी मध्ये शंभू महादेवाच्या वाघाच्या काठीची व कावडीची प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी गुढी पाडव्याच्या शुभ दिनी सायंकाळी भव्य दिव्य मिरवणूक जंगम गल्लीतील मठपती दयानंद त्रिंबक स्वामी यांच्या घरून काढण्यात आली .

19 मार्च रोजी गुढी पाडव्याच्या दिवशी सकाळी 10 वाजता वाघाच्या काठीचा व कावडीचा विधीवत स्थापना सोहळा पार पडला . त्यानंतर दिवसभर भक्तगण दर्शनासाठी व नैवेद्य दाखवण्यासाठी जंगम गल्लीतील मठपतीच्या घरी येत होते .

सांयकाळी 5 वाजता स्वामी (मठपती) परिवार व निवनिर्वाचित नगरसेवक सौ जयश्रीताई मोगरकर, श्री योगश भैय्या मेनकुदळे व श्री नितीन भैय्या बागवाले यांच्या हस्ते शंभु महादेवाच्या काठीची व कावडीची पूजा करून महाआरती करण्यात आली. साखरेच्या गाठीची माळ , पुष्पहार घालून व एकदा शंभूच्या नावाने हर बोला हर हर महादेव चा जयघोष करीत मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. जंगम गल्लीतील प्रांगणात जवळपास एक ते दीड तास भक्तगण व विशेष करून तरूण वर्ग ही 21 फुट



उंचीची वजनदार असलेली काठी तळहातावर घेऊन वाद्यांच्या तालावर लिलया नाचत होते. तदनंतर जंगमगल्ली , देशमुख गल्ली, गणेशपार , नांदुरवेस, इटके गल्ली, अंबेवेस या पारंपारिक पालखी मार्गाने जात असता प्रत्येक घरातून शंभु महादेवाच्या काठी व कावड चे स्वागत पुजा करून साखरेच्या गाठीची माळ घालून पुजा करण्यात येते होती.

शंभु महादेवाच्या काठी व कावड ची मिरवणूक रात्री देशमुख पार येथील माजी आमदार कै.लक्ष्मणराव देशमुख यांच्या गडी (वाड्यावर) नेण्यात आली. तेथे देशमुख परिवारा तर्फे महादेवाच्या काठी चे स्वागत करण्यात आले व विधिवत पूजा करून तेथेच काठी व कावडची स्थापना करण्यात आली. मठपती परिवार व देशमुख परिवार या दोन्ही घरांशी निगडीत 150 वर्षापेक्षा जास्त




वर्षाची परंपरा असलेला उत्सव मठपती परिवाराच्या वतीने थाटात सुरू होतो व देशमुख परिवाराच्या आगतस्वागताने या दिवसभराच्या सोहळ्याची सांगता होते.

एकदा शंभूच्या नावाने हर बोला हर हर महादेव या जयघोषात 21 फुट उंच असलेली वजनदार काठी तळहातावर घेऊन वाद्यांच्या तालावर नाचवणे ही शिवभक्तांसाठी मोठ्या कौशल्याची, भक्तीची व शक्तीची परिक्षा असते व हा अद्वितीय क्षण पाहणाऱ्यास अलौकिक आनंद देतो असे उपस्थित शिवभक्त सांगता सोहळ्यानंतर एकमेकांना बोलताना दिसून येत होते. देशमुखाकडे विराजमान असलेली काठी व कावड एकादशी च्या सध्याकाळी प्रभु वैद्यनाथाच्या मंदीरात जाऊन तेथून मठपतीच्या घरी चैत्र आमावस्ये पर्यंत उभी असते. द्वादशीपासून भक्तगण सोयीनुसार खीर आंबील घुगऱ्या नैवेद्य करून आणून दाखतात व याच काळात एकदा शिखर शिंगणापूर ला शिखराला लावण्यासाठी वाघाची काठी व कावड नेली जाते. अमावस्येला खीर आंबिल चा नैवेद्य प्रसाद करून या संपूर्ण एक महिन्याच्या सोहळ्याची सांगता होते व वाघ स्वरूपातील शंभु महादेव मठपतीच्या देव्हाऱ्यात स्थानापन्न होतात. यावर्षीच्या गुढीपाडव्याच्या दिमाखदार सोहळ्यात शंभु महादेवाच्या वस्त्रासारखा जवळपास सर्व शिवभक्तांचा एक सारखा गणवेश व महिलांच्या ही एक सारख्या साड्या हे एक विशेष आकर्षण होते .या मिरवणूक सोहळ्यात जंगम समाज , वीरशैव लिंगायत समाज तसेच इतर अनेक शिवभक्त मित्रगण , तरुण वर्ग या शिवभक्तांसह देशमुख पार येथील देशमुख परिवारातील अनेक सदस्यांसह स्वामी मठपती परिवारातील सर्व सदस्यांचा व भक्तगणांचा मोठा सहभाग होता .

# महाड क्रांती: सामाजिक न्यायाच्या लढ्यातील एक ऐतिहासिक पर्व

**20 मार्च 1927 हा दिवस भारतीय इतिहासात सामाजिक न्यायाच्या लढ्यातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला. या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे चवदार तळ्याच्या पाण्यासाठी ऐतिहासिक सत्याग्रह केला. या घटनेला 'महाड क्रांती दिन' म्हणून ओळखले जाते.**





**सत्याग्रहाची पार्श्वभूमी:** हिंदू धर्मातील वर्णव्यवस्थेमुळे अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या लोकांना सार्वजनिक पाणवठ्यांवर पाणी पिण्याचा हक्क नव्हता. महाड नगरपालिकेने 1924 मध्ये अस्पृश्यांना चवदार तळ्याचे पाणी वापरण्याची परवानगी दिली होती, परंतु सनातनी लोकांनी या आदेशाला विरोध केला. या पार्श्वभूमीवर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या हक्कांसाठी सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला.

**सत्याग्रहाचे स्वरूप:** 20 मार्च 1927 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली हजारो अस्पृश्य लोक महाड येथे जमले. या लोकांनी चवदार तळ्याकडे मोर्चा काढला आणि तळ्यातील पाणी पिऊन आपला हक्क प्रस्थापित केला. या सत्याग्रहामुळे सनातनी लोकांमध्ये खळबळ माजली आणि त्यांनी अस्पृश्यांवर हल्ले केले.

**सत्याग्रहाचे महत्त्व:** महाडचा सत्याग्रह हा अस्पृश्यांच्या हक्कांसाठी लढा देणाऱ्या चळवळीतील एक महत्त्वाचा टप्पा होता. या सत्याग्रहामुळे अस्पृश्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आणि त्यांनी आपल्या हक्कांसाठी लढा देण्यास सुरुवात केली. महाडचा सत्याग्रह हा सामाजिक न्यायाच्या लढ्यातील एक प्रेरणादायी घटना आहे.

**महाड सत्याग्रहाचे परिणाम:** या घटनेमुळे अस्पृश्यांमध्ये आत्मविश्वास वाढला आणि त्यांनी आपल्या हक्कांसाठी संघर्ष सुरू ठेवला. या घटनेने सामाजिक सुधारणांच्या चळवळीला गती दिली. महाड सत्याग्रहाने अस्पृश्यांच्या हक्कांच्या लढ्यात एक महत्त्वाचा टप्पा गाठला.

**महाड क्रांती दिनाचे महत्त्व:** महाड क्रांती दिन हा सामाजिक समता आणि न्यायाचा दिवस म्हणून साजरा केला जातो. हा दिवस आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या त्यागाची आणि समर्पणाची आठवण करून देतो. महाड क्रांती दिन आपल्याला सामाजिक भेदभाव आणि अन्याय यांच्या विरोधात लढण्याची प्रेरणा देतो.

**महाड क्रांतीचे दूरगामी परिणाम:**

महाड क्रांतीने केवळ अस्पृश्यांच्या हक्कांचा प्रश्न उपस्थित केला नाही, तर भारतीय समाजातील जातिव्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण केले. या घटनेने सामाजिक सुधारणांच्या चळवळीला गती दिली आणि अस्पृश्यांच्या हक्कांसाठी लढा देणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना प्रेरणा दिली.

**महाड क्रांतीचे विविध पैलू:** महाड सत्याग्रह केवळ पाणी पिण्याच्या हक्कासाठी नव्हता, तर तो मानवी प्रतिष्ठेचा आणि समानतेचा लढा होता. या घटनेने भारतीय समाजातील जातिव्यवस्थेवर थेट प्रहार केला आणि सामाजिक सुधारणांच्या चळवळीला चालना दिली.महाड सत्याग्रहाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाची ताकद दाखवून दिली आणि त्यांना अस्पृश्यांच्या हक्कांचे प्रमुख नेते म्हणून प्रस्थापित केले. या सत्याग्रहाने सामूहिक कृतीचे महत्त्व अधोरेखित केले आणि अस्पृश्यांना त्यांच्या हक्कांसाठी एकत्र येण्याची प्रेरणा दिली. महाड सत्याग्रहाने अस्पृश्यांच्या हक्कांसाठी कायदेशीर लढाईची सुरुवात केली, जी पुढे भारतीय राज्यघटनेत दिसून आली. **महाड क्रांतीचे स्मरण:** आजही, महाड क्रांती दिन आपल्याला सामाजिक समता आणि न्यायाच्या मूल्यांची आठवण करून देतो. हा दिवस आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित समाजाची निर्मिती करण्यासाठी प्रेरित करतो. महाड क्रांती दिनाचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका घटनेचे स्मरण करणे नाही, तर सामाजिक न्यायाच्या मूल्यांचे स्मरण करणे आहे. हा दिवस आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित समाजाची निर्मिती करण्यासाठी प्रेरित करतो, जिथे प्रत्येक व्यक्तीला समान हक्क आणि सन्मान मिळेल.

**■ प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे**

---

**२० मार्च जागतिक चिमणी दिवस**

# विषय:- आई चिमणीचे नाव घेऊन घास भरवायची ;आज चिमण्यांना वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर.



जागतिक चिमणी दिवस साजरा करतांना चिमण्यांना व संपूर्ण पशुपक्ष्यांना कशा पध्दतीने वाचविता येईल यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत. चिमण्यांना रहाण्याकरीता घरटे नाहीत याकरिता वृक्षारोपण व्हायला हवे, उन्हाळ्यात चिमण्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. त्यामुळे आतापासूनच जीथे-जीथे चिमण्या येवू शकतात तीथे-तीथे किंवा आपल्या घराच्या भिंतीवर किंवा घरावर एखाद्या तबकड्यात पाणी अवश्य ठेवावे सोबतच खाण्याकरिता थोडे तांदळाचे दाणे किंवा खाद्य टाकावे. कारण चिमण्यांना खरोखरच आपली नितांत गरज आहे. अन्यथा ज्या चिमण्या दिसतात त्या सुध्दा लुप्त होवू शकतात याला नाकारता येत नाही.

कारण दिवसेंदिवस चिमण्यांसह इतरही पक्षांचे प्रमाण कमी-कमी होतांना दिसत आहे. चिमण्यांच आपल्या मानव जातीवर खुप मोठे उपकार आहेत ते तर आपण फेडुच शकत नाही.परंतु आज बदलत्या काळानुसार व बदलत्या हवामानामुळे त्यांच्यावर मोठे संकट ओढावले आहे. त्यातुन मुक्त करण्यासाठी थोडा हातभार आपण लावु शकतो याकरिता पाण्याची सोय व खाद्यान्नाची सोय सर्वांनीच आपापल्या परीने केली पाहिजे.चिमण्यांच्या अनुषंगाने अनेक पक्षी पाण्याचा व खाद्यान्नाचा स्वाद अवश्य घेतील आणि आयुष्य वाढेल व चिमण्यांचा किलबिलाट सर्वत्र दिसून येईल.जगातील चिमण्यांची घटती संख्या लक्षात घेता जगातील देशांनी चिमण्यांना वाचविण्याच्या दृष्टीकोनातून जागतिक चिमणी दिवस साजरा करण्याचे जाहीर केले. याकरीता २० मार्च ही तारीख ठरविण्यात आली आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहाय्याने पहिला जागतिक चिमणी दिवस २० मार्च २०१० ला साजरा करण्यात आला. भारतात सगळीकडे सर्वात जास्त संख्येने सापडणारा, मानसाच्या जवळपास वावरणारा व नेहमी डोळ्यांनी दिसणारा पक्षी म्हणून चिमणीची भारतभर चांगलीच ओळख आहे.आज जगातील बदलत्या तापमानामुळे व हवामानामुळे, युद्धजन्य परिस्थिती,परमाणू परिक्षण, वाढते औद्योगिकीकरण, मोबाईलचे टॉवर,वाढते शहरीकरण, जंगलतोड, शेतातील रासायनिक खतांचा वापर व किटकनाशके,वणवे लागणे,ध्वनी प्रदुषण, पाणथळ्यांच्या जागा नष्ट झाल्याने आणि जगातील वाढती यूध्दजन्य परिस्थिती यामुळे चिमण्यांसह अन्य पशु-पक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले असुन धोकादायक स्थितीत आहे.यामुळे अनेक पशु-पक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. आज जंगल तोडीमुळे जंगलातील पशु-पक्षी शहराकडे धाव घेतांना दिसते. हा संपूर्ण प्रकार निसर्गाचा होत असलेल्या ह्रासामुळे दिसून येतो व मानवजातीच्या अतीक्रमनामुळे निर्माण झाला आहे.पुर्वी कवेलुचे घर असायचे, मातीच्या भिंती असायच्या त्यामुळे चिमण्या आपले घरटे कुठे तरी अवश्य बनवायचे. कारण कवलाचे घर व मातींच्या भिंती नेहमी थंड असतात याचा सहारा घेऊन रहायचे. त्यामुळे प्रत्येक घरामध्ये आपल्याला चिमण्यांचे घरटे अवश्य दिसायचे व चिमण्यांचा मधुर किलबिलाट ऐकू यायचा.यावरून सकाळचा काय वेळ झाला आणि संध्याकाळचा काय वेळ झाला हे त्यांच्या किलबिलाट वरून ताबडतोब सर्वांनाच लक्षात यायचे.परंतु आज चिमण्यांचा किलबिलाट नामशेष झाल्याचे दिसून येते. आज चिमण्यांना घरटे बांधण्यासाठी योग्य जागा मिळत नाही, पाण्यासाठी वणवण हिंडावे लागते अशी भयावह परिस्थिती आज चिमण्यांची झाली आहे.आज घरांचे सिमेंटीकरण झाल्याने चिमण्यांना घरटे बांधण्यास मोठा संघर्ष करावा लागतो आहे.वाढत्या प्रदुषणांमुळे व उष्णतामानामुळे चिमण्यां व इतर पशु-पक्षांना हवेत मोकळा स्वास सुध्दा मिळु शकत नाही.अशी कठीण व गंभीर परिस्थिती पशु-पक्षांवर असलेली आहे. आपण चीनचा विचार केला तर १९५८-६२ या कालावधीत चार किटक मोहिम राबविण्यात आली त्यात पिकांचा नाश करणाऱ्या घटकांना म्हणजे उंदीर,माश्या,डास आणि चिमण्या हे चार नष्ट करायचे सरकारने ठरविले. यामुळे चीनमध्ये चिमण्या जवळपास संपुष्टात आल्याचे दिसून येते. त्यामुळे याचा गंभीर परिणाम चीनच्या पर्यावरणावर झाला आहे. यानंतर पक्षी तज्ज्ञांनी अभ्यासाच्या अंती सांगितले की चिमणी पर्यावरणाच्या दृष्टीने जगाला आवश्यक आहे. जगभरात २६ जातिंच्या चिमण्यांची नोंद आहे.परंतु यातील अनेक चिमण्यांच्या जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जगातील पक्षांचा विचार केला तर ८६७ प्रजाती आहेत.परंतु गेल्या पंचवीस वर्षांत आतापर्यंत पक्षांच्या संख्येने सर्वात मोठी घट झाली आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. त्याचप्रमाणे कीटकभक्ष्यी चिमण्यांची संख्या कमी होने अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.कारण चिमण्यांची घटती संख्यांचा प्रश्न सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारा आहे. कारण पिकांवर पडणाऱ्या अळ्या आणि किटक चिमण्या खायच्या परंतु चिमण्यांच्या घटत्या संख्येमुळे पिकांवर सुध्दा दुष्परिणाम होतांना दिसतो. एकेकाळी चिमणी हा आपला अत्यंत महत्त्वाचा पक्षी होता कारण लहान मुले जेवणाकरीता कंटाळा करायचे तेव्हा आपली आई किंवा आजी चिमणीची आठवण अवश्य करायची व लहान मुले पोटभर जेवण सुध्दा करायची."चिऊताई-चिऊताई चारा खा, पाणी पी आणि भुर्र उडून जा" असे म्हणत आपला घास भरत यामुळे आपलं बालपण समृद्ध झाले.कारण आई व आजी इतर पक्षांची ओळख करून देतांना चिऊताईचा लाड जास्तच करायची. चिमण्यांनी आपल्याला बरेच काही दिले त्यामुळे आज त्यांना आपल्या कडून फक्त पाण्याची अपेक्षा आहे ती आपण अवश्य पुर्ण करू या.जागतिक चिमणी दिवसाचे औचित्य साधून भारतासह जगातील संपूर्ण देशांनी आजच्या दिवशी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचा संकल्प करावा व वृक्षारोपण करावे.यामुळे गुरांना चारा,पशु-पक्षांना रहाण्यासाठी घरट्यांसाठी जागा उपलब्ध होईल, मानवाला शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे पर्यावरण सुधारण्यास मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित राहील आणि जिकडे-तिकडे हिरवागार गालिचा पसरलेला दिसुन येईल. आपण सर्वांनीच चिमण्या वाचविण्याचा संकल्प करूया.जय हिंद!

**■ लेखक रमेश कृष्णराव लांजेवार (स्वतंत्र पत्रकार )**

---




# संतश्री रानबा महाराज मंदिर येथे गुढीपाडव्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात संपन्न

**■ परळी/प्रतिनिधी**

परळी वैजनाथ येथील संत श्री रानबा महाराज मंदिर येथे आज गुरूवार दिनांक 19 मार्च रोजी सकाळी 9 वाजता हिंदू धर्मियातील नववर्ष गुढीपाडवा उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त संत श्री रानबा महाराज यांची माजी नगरसेवक विठ्ठल तात्या दंदे व मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजा व आरती करण्यात आली. भजन कीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम यावेळी पार पडले. यावेळी भाविक भक्तांना खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास परळी शहर व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रति वर्षाप्रमाणे याहीवर्षी परळी वैजनाथ येथील पंचायत समिती समोर असलेले संत श्री रानबा महाराज यांचे मंदिर आहे. गुढीपाडवा नववर्षानिमित्त संत श्री रानबा महाराज मंदिर फुलांनी सजविण्यात आले होते. दिवसभर भजन कीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. उपस्थित भाविक भक्तांचे स्वागत ज्ञनेश्वर खर्डे ,रामेश्वर खर्डे, पांडुरंग खर्डे, ओम खर्डे व खर्डे परिवारांनी केले.दरम्यान रानबा महाराज मंदिर येथे भाविकांनी दर्शनासाठी दिवसभर गर्दी केली होती.

---

# वनमालाताई राठोड कनिष्ठ महाविद्यालयाचा जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत घवघवीत यश

**■ महागाव प्रतिनिधी**




राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत वनमालाताई राठोड कनिष्ठ महाविद्यालय, आमणी (बु.) येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. दरवर्षी २४ डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने मा. जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ (पुरवठा विभाग) यांच्या वतीने २४ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत "ग्राहक जागृती सप्ताह" आयोजित करण्यात आला होता. ग्राहकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे आणि बाजारातील फसवणुकीपासून त्यांचे संरक्षण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या पार्श्वभूमीवर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी "ग्राहक जागृती – काळाची गरज" या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेसाठी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांसाठी अनुक्रमे ₹3000, ₹2000 व ₹1000 रोख पारितोषिकांसह प्रमाणपत्र देण्यात येणार होते. जिल्हाभरातून सुमारे ९०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

या स्पर्धेत वनमालाताई राठोड कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावले. द्वितीय क्रमांक राजनंदिनी चंदन चव्हाण हिने मिळवला, तर वैष्णवी अमोल गुड्डप हिने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच प्रोत्साहनपर पारितोषिकांमध्ये चंचल अमोल जाधव, अस्मिता गजानन पुरी आणि राधेश्याम मंगल जाधव या विद्यार्थ्यांनीही आपली नावे उज्ज्वल केली.

दिनांक १६ मार्च २०२६ रोजी बळीराजा चेतना भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे आयोजित समारंभात जिल्हाधिकारी मा. विकास मीना व जिल्हा पुरवठा अधिकारी मा. संघपाल मेश्राम यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. संस्थेच्या सचिव मा. वनमालाताई राठोड यांनी सांगितले की, "ग्राहक जागृती ही आजच्या काळाची अत्यंत गरज आहे. विद्यार्थ्यांनी अशा स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. आमच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश संस्थेसाठी अभिमानास्पद असून भविष्यातही त्यांनी अशीच प्रगती करावी," अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कोषाध्यक्ष मा. सुनीलभाऊ राठोड यांनीही आपले मत व्यक्त करत सांगितले की, "विद्यार्थ्यांचे हे यश त्यांच्या मेहनतीचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे फलित आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता आणि आत्मविश्वास वाढतो. पुढील काळातही विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात असेच यश संपादन करावे," असे त्यांनी नमूद केले.

तसेच मुख्याध्यापक के. एन. कावडे व प्राचार्य जय वानखेडे यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयातील शिक्षकवृंद, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव केला.

---





# 'परळी संचार'च्या वर्धापन दिन विशेषकांचे अशोकसेठ जैन यांच्या हस्ते प्रकाशन

**■ परळी वैजनाथ, ता.१९ (बातमीदार):**

'परळी संचार' या वृत्तपत्राने सर्वसामान्यांचे प्रश्न मांडावेत असे प्रतिपादन वैद्यनाथ बँकेचे माजी अध्यक्ष अशोकसेठ जैन यांनी केले.

'परळी संचार'च्या पाचव्या वर्धापननिमित्त काढण्यात आलेल्या विशेषकांचे प्रकाशन गुढीपाडव्यानिमित्त गुरूवारी (ता.१८) दुपारी जैन यांच्या संपर्क कार्यालयात झाले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास अंबाजोगाई वार्ताचे संपादक परमेश्वर गित्ते, ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण वाकडे, परळी संचार कार्यकारी संपादक प्रा.प्रवीण फुटके, मातोश्री ऑफसेटचे संचालक विठ्ठलराव साबळे, दत्ता शिवगण यांच्यासह परळी संचारचे संपादक अनंत कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. श्री जैन यांनी वर्धापन दिनाच्या अंकाचे कौतुक करून संपादक अनंत कुलकर्णी यांना शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक श्री कुलकर्णी यांनी केले. यावेळी लक्ष्मण वाकडे यांनी विचार मांडून वर्धापन दिनास शुभेच्छा दिल्या. आभार प्रदर्शन दत्ता शिवगण यांनी केले.

दरम्यान, एबीपी माझा या वृत्तवाहिनीच्या संपादिका सरिता कौशीक यांनी वैद्यनाथाचे दर्शन घेतले. या दरम्यान, त्यांनी परळी संचारच्या वर्धापनदिन विशेषांकाचे विमोचन करून अनंत कुलकर्णी यांना शुभेच्छा दिल्या. **

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

## संपादकीय

# भारताचा नवा इतिहास

२०२६ मध्ये भारत जगातील चौथी अर्थव्यवस्था झाला आहे आणि त्याने जपानलाही मागे टाकले आहे. विशेष म्हणजे, भारताने हे यश टॅरिफच्या सावटात मिळवले. २०२६ च्या पहिल्या सहामाहीत आंतरराष्ट्रीय मुद्रा कोषाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, भारताचे सकल राष्ट्रीय उत्पादन ४.१८ ट्रिलियन डॉलर इतके झाले आहे.

भारताने महागाई नियंत्रणात ठेवली आहे आणि बेरोजगारी कमी होत आहे. मोदी यांनी केलेल्या उपाययोजनांमुळे निर्यातीत सुधारणा झाली आणि भारताचा आयात-निर्यात समतोल सुधारला. भारत आता जगातील सर्वात जास्त वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांमध्ये सामील झाला. अगदी काही वर्षांपूर्वी भारत हा जगातील सर्वात मागास देशांपैकी एक होता आणि येथील जीडीपी साडेतीन टक्क्यांच्या वर कधी जात नव्हता. हा काळ तो होता जो देश डावे आणि मध्यममार्ग यांच्या कचाट्यात सापडला होता आणि इंदिरा गांधी यांच्या काळात तर सरकार डाव्यांच्या मगरमुठीत होते. पण ज्यावेळी मोदी सत्तेवर आले आणि तेव्हापासून भारताच्या अर्थव्यवस्थेने कात टाकण्यास सुरुवात केली आणि आज भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे. मुडीजच्या अनुसार भारत २०२६ मध्ये ६.४ आणि २०२७ मध्ये ६.५ च्या गतीने वाढू शकेल, तर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताची गती २०२६ मध्ये ६.२ टक्के इतकी असेल असा अंदाज लावला आहे. अर्थात भारताची प्रगती सर्वत्र दिसते आणि रस्ते, सुविधा, लोकांचे जीवनमान कसे सुसह्य होईल हे मोदी सरकारने पाहिले. एकेकाळी जो देश हत्ती आणि सापांचा देश म्हणून ओळखला जात होता, त्या देशाने इतकी मोठी झेप घेणे ही निश्चितच कौतुकाची बाब आहे. याचे श्रेय निःसंशय मोदी यांना आहेच. पण भारताची जनता आणि येथील नागरिकांनाही आहे. काँग्रेसला हे मान्य नाही आणि त्यामुळे रशिद अल्वी यांनी ही बातमीच संपूर्ण चुकीची आणि निराधार आहे असे म्हटले आहे. काँग्रेसच्या काळात भारताने कधीही जीडीपी टक्क्यांच्या वर गेला नव्हता. आज तो ८ टक्क्यांच्या वर आहे आणि हे काँग्रेसला कसे पाहावणार. एवढ्यावरच भारताची प्रगती थांबणार नाही.

२०३० पर्यंत भारत आता जर्मनीला मागे टाकण्याचा अंदाज आहे. ही भारतासाठी सर्वात मोठी उपलब्धी आहे. अर्थात या आकडेवारीवरून भारतातील लोक सुखी आहेत की नाहीत याचा अंदाज येऊ शकत नाही, पण आकडेवारी ही एक प्रकारे मानदंड असते आणि त्यावरून असा निष्कर्ष काढता येतो, की लोक सुखी असू शकतात. २०३० पर्यंत भारताचा जीडीपी म्हणजे सकल देशांतर्गत उत्पादनाचा आकडा ७.३ ट्रिलियन डॉलरपर्यंत जाईल. आकडेवारी नीरस वाटू शकेल. पण भारताची प्रगती तर डोळ्यांना दिसते आहे आणि आज लोक सुखी जीवनमान जगत आहेत आणि त्यांच्याबरोबर महागाई नियंत्रणात आहे आणि बेरोजगारी कमी झाली आहे. अगदी पूर्वी म्हणजे १९५० ते १९८० च्या काळात भारताचा प्रगतीचा वेग मंद होता आणि तो एक टक्क्यांपेक्षा कमी होता. नंतरच्या दशकात गरिबी घटली आणि विकासदराने लक्षणीय झेप घेतली. काँग्रेस सरकारप्रमाणे गरिबी हटाव अशा घोषणा न देताही मोदी सरकारने गरिबी घटवली आणि रोजगारी वाढवली. तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिले आणि तरीही चीनच्या तुलनेत भारताची कामगिरी कमीच राहिली, पण आता भारत जपानला मागे टाकून चौथ्या क्रमाकांची अर्थव्यवस्था बनला आहे आणि यापुढचे लक्ष्य आहे ते जर्मनीला मागे टाकण्याचे.

गेल्या काही वर्षांत अनेक शहरे जी कधीही प्रतिनिधींचे गंतव्यस्थान नसते ती आता गंतव्यस्थान बनले आहे आणि याचे उदाहरण आहे उत्तर प्रदेश भारताची वृद्धी. साडेसहा टक्क्यांनी राहिली तर जगाची वृद्धी ही तीन टक्क्यांच्या आसपास राहिली. याचा अर्थ जागतिक वृद्धी दरातील भारताचा वाटा १५ टक्के इतका मोठा राहील. २०१३ मध्ये भारत, इंडोनेशिया, ब्राझिल, दक्षिण आफ्रिका आणि तुर्की या पाच देशांना तकलादू अर्थव्यस्था म्हणून समजले जात होते. पण आज त्यातून भारत कधीच बाहेर निघाला आहे. भारताला सतावत होता तो प्रश्न बॅलन्स ऑफ पेमेंट्सचा. पण आज त्यावर भारताने मात केली आहे आणि मोदी यांच्या कुशल मार्गदर्शनामुळे भारत आज जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे. आज भारतातील सामान्य लोकही उद्योजक होत आहेत आणि भारताचे सर्वसामान्य लोक आपले उद्योग चालवतात आणि त्यांच्यावर कित्येक लोक अवलंबून राहतात. भारताचे परकीय भांडवलावरील अवलंबित्व कमी झाले आहे आणि मोदी सरकारने सामान्यांच्या बँक खात्यांची संख्या वाढवल्यामुळे लोकांनां बँकिंगच्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. याचाच अर्थ असा की, लोकांना आता सुख-सुविधा उपलब्ध होत आहेत.



## गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर 'केदार टाईल्स & ग्रेनाईट'चे भव्य उद्घाटन थाटात संपन्न : माजी मंत्री. आ. धनंजय मुंडे यांची उपस्थिती





**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी शहरात बांधकाम साहित्य क्षेत्रात एक नवे आकर्षण ठरणाऱ्या 'केदार टाईल्स & ग्रेनाईट' या भव्य शोरूमचे उद्घाटन गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि थाटामाटात संपन्न झाले. या शोरूमचे उद्घाटन माजी मंत्री. आ. धनंजय मुंडे (माजी कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते पार पडले.

उद्घाटन प्रसंगी राजकीय, सामाजिक, व्यावसायिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमस्थळी उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.

परळी-बीड महामार्गावरील पूजा मंगल कार्यालयाजवळ सुरू झालेल्या या आधुनिक शोरूममध्ये बांधकामासाठी लागणारे सर्व साहित्य एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामध्ये आकर्षक आणि आधुनिक डिझाईन्सच्या टाईल्स, दर्जेदार ग्रॅनाईट व मार्बल, सॅनिटरी वेअर, सिमेंट आणि स्टील यांचा समावेश आहे. या शोरूमचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे अंबाजोगाई व लातूरपेक्षा परवडणाऱ्या दरात दर्जेदार साहित्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे आयोजकांनी सांगितले. त्यामुळे ग्राहकांना कमी खर्चात उत्तम दर्जाचे साहित्य मिळण्याची सुविधा येथे उपलब्ध झाली आहे. ग्राहकांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन आधुनिक डिझाईन्स, मजबूत बांधकाम साहित्य आणि विश्वासार्ह गुणवत्ता यावर विशेष भर देण्यात आला आहे. त्यामुळे आपल्या स्वप्नातील घर साकार करण्यासाठी आवश्यक असणारी सर्व सामग्री येथे सहज उपलब्ध होणार आहे. भव्य शोरूम, आकर्षक सादरीकरण आणि खात्रीशीर दर्जा हीच 'केदार टाईल्स & ग्रेनाईट'ची ओळख ठरणार असून परिसरातील नागरिकांनी या शोरूमला भेट देऊन या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## काळमवाडीच्या जि .प .शाळेत विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव उत्साहात !

### गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर ३० विद्यार्थी दाखल ! उभारली पुस्तकांची प्रतिकात्मक गुढी !

**शिराळा/प्रतिनिधी**

काळमवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रवेश उत्सवास पालकांचा मोठा प्रसाद मिळाला. यावेळी इयत्ता पहिलीत ३० विद्यार्थी दाखल करण्यात आले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अजित सावंत आणि उपाध्यक्ष सिताराम सावंत यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करून गुढीपाडवा पट वाढवा या अभियानांतर्गत इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव पार पडला. यावेळी नवोदित विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प आणि बिस्कीटे देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी शाळेचे वरिष्ठ मुख्याध्यापक सुरेश यटम, दीपक रोकडे, संपतराव पाटील, सुनील हवालदार, राहुल मोरे, सुहास पाटील, सचिन बामणे, संगीता सुपने, मनीषा काटवटे, उपस्थित होते.

### उभारली पुस्तकांची प्रतीकात्मक गुढी !

शाळेचे उपक्रमशील शिक्षक दीपक रोकडे यांच्या संकल्पनेतून यावेळी पुस्तकांची प्रतीकात्मक गुढी उभारण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या पुस्तकाबरोबरच पालकांनी ग्रंथालयास दिलेल्या पुस्तकांची गुढी उभारण्यात आली. विद्यार्थ्यांनी अभ्यासातील पुस्तकांबरोबरच इतरही अवांतर पुस्तके वाचावीत, त्यांनी वाचनाकडे वळावे यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला. दीपक रोकडे यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनी वाचनाचा संकल्प केला.



## औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता व अधिकारी व कर्मचारी आणि दाऊतपूर ग्रामपंचायतच्या मनमानी कारभारा विरोधात वंचित बहुजन आघाडीच्या रास्ता रोको आंदोलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहा- मिलिंद घाडगे

**परळी प्रतिनिधी**



परळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता व अधिकारी कर्मचारी आणि ग्रामपंचायत दाऊतपुर यांनी संगणमत करून शासनाचा 100 ते 1500 कोटीचा महसूल बुडवला तसेच ग्रामपंचायत दाऊतपुरला जवळपास 400 ते 500 कोटी रुपयांचा फायदा झाला आहे.

सन 2023 मध्ये औष्णिक विद्युत केंद्राची राखेची टेंडर प्रक्रिया होऊन त्यामध्ये राखेचा मॅट्रिक टनाचा दर 353 तर ग्रामपंचायत दाऊतपुरच्या नावे राख उचलण्याची सेल ऑर्डर No.05600 दिनांक 26/11/2025 रोजी मुख्य अभियंता यांच्या स्वाक्षरीने ग्रामपंचायत दाऊतपुर यांना केवळ 177 रुपये प्रति टन दराने देण्यात आली. या सेल ऑर्डर मध्ये सुमारे 354000 मॅट्रिक टन पॉड ash राख उचलण्याची सेल ऑर्डर म्हणजे तब्बल 25000 ट्रिप हायवा राख उचलण्याची ऑर्डर देऊन ग्रामपंचायत दाऊतपुर यांना आजच्या बाजारभावाप्रमाणे सुमारे 400 ते 500 कोटी रुपयांचा फायदा होत आहे. यामध्ये केवळ ग्रामपंचायत दाऊतपुर सरपंच व ग्रामसेवक हे धनदांडग्या उच्चभ्रू राख माफीया यांना पोसण्याचा धंदा करत आहे. आम्ही वंचित बहुजन आघाडीच्या वतीने दिनांक 09/03/2026 रोजी चुकीच्या पद्धतीने केलेल्या राखेच्या टेंडरच्या विरोधात आंदोलनाचे निवेदन देण्यात आले त्यामुळे 60 टक्के राख टेंडर प्रक्रिया चा दिनांक 17/03/2026 रोजी लिलाव झाला असता राखेचा प्रति टन दर 1921 रुपये इतका झाला. तर मग ग्रामपंचायत दाऊतपुरला च फक्त 177 प्रति टन दराने का देण्यात आला ? असा सामान्य नागरिकांना प्रश्न पडला आहे. औष्णिक विद्युत केंद्राच्या राखेच्या प्रदूषणापासून प्रदूषण बाधित दाऊतपुर व विद्युत केंद्राच्या परिसरातील इतर गावांतील नागरिकांना व लहान मुलांना तसेच शाळेतील विद्यार्थ्यांच्या शिजवलेल्या खिचडी मध्ये राखेच्या प्रदूषणा चे धुळीचेकण खिचडी द्वारे पोटात जाऊन लहान मुलांना अनेक रोगांची लागण होत आहे. ग्रामपंचायत दाऊतपुर केवळ धनदांडग्या लोकांनाच सेल ऑर्डरच्या गेट पास देऊन गरीब बहुजन मागासवर्गीय वंचित लोकांवर अन्याय करत आहे त्यामुळे या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी व बहुजन मागासवर्गीय नागरिकांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने दिनांक 20/03/2026 रोजी छत्रपती संभाजी महाराज चौक (इटके कॉर्नर ) परळी येथे सकाळी ठीक 10.00 वाजता वंचित बहुजन आघाडीच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येत आहे. तरी दाऊतपुर व प्रदूषण बाधित औष्णिक विद्युत केंद्राच्या परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी व्हावे असे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे महासचिव मिलिंद घाडगे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## 'वैद्यनाथ मिल्क अँड प्रॉडक्ट'चा भव्य शुभारंभ

### स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यामार्गदर्शनातूनच डेअरी क्षेत्रात कार्य करण्याची प्रेरणा मिळाली : फुलचंद कराड






**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

गुढीपाडव्याच्या पावन पर्वावर परळी शहरात दुग्ध व्यवसायाला नवी चालना देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू झाला आहे. परळी तालुका दूध व्यवसायिक संघ मर्या., परळी वैजनाथ यांच्या वतीने 'वैद्यनाथ मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट' या डेअरी प्रकल्पाचा भव्य उद्घाटन सोहळा शुक्रवार, दि. १९ मार्च २०२६ रोजी दुपारी १ वाजता उत्साहात पार पडला. या प्रसंगी भगवान सेनेचे सरसेनापती तथा शिवसेना शिंदे गटाचे महाराष्ट्र समन्वयक, परळी तालुका दूध संघाचे चेअरमन श्री. फुलचंद भाऊ कराड यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन सोहळ्यास तालुक्यातील दूध उत्पादक, शेतकरी, व्यापारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्थानिक दूध उत्पादकांना हक्काची बाजारपेठ मिळावी आणि ग्राहकांना शुद्ध व ताजे दुग्धजन्य पदार्थ थेट उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. 'उत्पादक ते थेट ग्राहक' या संकल्पनेवर आधारित असलेला हा उपक्रम परळी परिसरातील दुग्ध व्यवसायासाठी एक नवा मैलाचा दगड ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

यावेळी उद्घाटनपर भाषणात भगवान सेनेचे सरसेनापती तथा शिवसेना शिंदे गटाचे महाराष्ट्र समन्वयक, परळी तालुका दूध संघाचे चेअरमन श्री. फुलचंद कराड यांनी सांगितले की, भारत हा जगातील सर्वाधिक दूध उत्पादन करणारा देश असून सुमारे ३३ टक्के दूध उत्पादन भारतात होते. या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी आणि त्यांच्या उत्पादनाला योग्य दर मिळवून देण्यासाठी हा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनातूनच या क्षेत्रात कार्य करण्याची प्रेरणा मला मिळाली. परळीच्या मातीत तयार होणारे दुधजन्य पदार्थाची चव वेगळीच आहे. इतर कंपन्यांचे प्रोडक्ट घेऊन बघा त्याची ही चव बघा. वैद्यनाथ दूध प्रॉडक्टच्या पदार्थाचे चव ही नक्कीच वेगळी आहे. यात मात्र शंका नाही. वैद्यनाथ दूध डेअरीच्या माध्यमातून आम्हाला शेतकऱ्यांच्या दूध उत्पादकांच्या जीवनात क्रांती घडवायची आहे. असेही भगवान सेनेचे सरसेनापती तथा शिवसेना शिंदे गटाचे महाराष्ट्र समन्वयक, परळी तालुका दूध संघाचे चेअरमन फुलचंद कराड यावेळी म्हणाले.

वैद्यनाथ दूध आणि दूध प्रॉडक्टचा शुभारंभ उद्घाटन चेअरमन फुलचंदभाऊ कराड यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी जेष्ठ नेते जीवराज ढाकणे, पाटलोबा मुंडे, माऊली फड, बाबा शिंदे, एम. टी. मुंडे, संभाजी सोळंके, सुंदर पाटील आंधळे, सुदाम मुंडे, विश्वनाथ मुंडे, मंचक मुंडे, महादेव कराड, बाबुराव कराड, रवी कराड, भक्तराम कांदे, सहदेव कांदे, मुक्ताराम कराड, प्रसाद कराड, इंद्रमोहन मुंडे, लक्ष्मण दिवटे, मदन मुंडे, विजय गित्ते, रामप्रभु कराड, ऋषिकेश मुंडे, बालाजी जाधव, प्रतीक मुंडे, वैजनाथ कराड, विठ्ठल नागरगोजे यांच्यासह आदी दूध उत्पादक शेतकरी उपस्थित होते . या कार्यक्रमास वैद्यनाथ दूधचे प्रदीप आंधळे, प्रशांत कराड, दत्ता मुंडे, महेश मुंडे, पिंटू मुंडे आदिसह परळी शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार तसेच दूध उत्पादक, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा डेअरी प्रकल्प नाथ टॉकीज रोड, ट्रेन्डस् शोरूम समोर, परळी वैजनाथ येथे सुरू करण्यात आला आहे. येथे ग्राहकांना दूध, दही, लस्सी, ताक, पनीर, तूप, खवा, बासुंदी, श्रीखंड, आम्रखंड, क्रीम आदी विविध दर्जेदार दुग्धजन्य उत्पादने उपलब्ध होणार आहेत. या उपक्रमामुळे स्थानिक शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळण्यासोबतच परळीकरांना शुद्ध व विश्वासार्ह दुग्धजन्य पदार्थांचा उत्तम पर्याय उपलब्ध झाला आहे.





# बडे बाबा'च्या जयघोषाने मच्छिंद्रनाथ गड दुमदुमला

### कावडीने समाधी स्नान आणि फटाक्यांची भव्य आतषबाजी;

### सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली सोहळा उत्साहात संपन्न

■ आष्टी (प्रतिनिधी)

गुढी पाडव्याच्या पूर्वसंध्येला सावरगाव येथील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही संजीवन समाधी सोहळा अत्यंत भक्तिभाव, उत्साह आणि शिस्तीत पार पडला. महाराष्ट्रासह देशभरातून लाखो नाथभक्त या सोहळ्यासाठी उपस्थित राहिल्याने संपूर्ण गड परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला होता.

नाथसंप्रदायातील महान योगी मच्छिंद्रनाथ यांच्या संजीवन समाधीचे दर्शन वर्षातून केवळ एकदाच, गुढी पाडव्याच्या पूर्वसंध्येला खुले केले जाते. यामुळे या दिवसाला विशेष महत्त्व असून, बुधवारी पहाटेपासूनच "बडेबाबांच्या" जयघोषात आणि टाळ-मृदंगाच्या निनादात भक्तांची पावले गडाकडे वळू लागली होती.

बुधवारी दुपारी १२ वाजता भक्तांनी आणलेल्या पवित्र कावडींद्वारे समाधी स्नान विधिवत पार पडले. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता मुख्य दर्शनासाठी समाधी खुली करण्यात आली. रात्रभर लाखो भाविकांनी शिस्तीत रांगेत उभे राहून शांततेत दर्शन घेतले. मध्यरात्री १२ वाजता नाशिक येथील भक्तांतर्फे करण्यात आलेल्या भव्य फटाक्यांच्या आतषबाजीने गड परिसर उजळून निघाला होता. गुरुवारी पहाटे सूर्योदयापूर्वी परंपरेनुसार समाधी दर्शन बंद करून समाधी पुन्हा झाकण्यात आली. सोहळ्याचे नियोजन अतिशय काटेकोरपणे करण्यात आले होते. देवस्थान समिती, विविध मंडळे, स्वयंसेवक आणि सावरगाव, शेंडगेवाडी येथील ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे एवढ्या मोठ्या संख्येतील भाविकांचे दर्शन निर्विघ्नपणे पार पडले.

### आमदार सुरेश धस यांचे मोलाचे सहकार्य

■ या भव्य सोहळ्याच्या यशस्वी आयोजनात आमदार सुरेश धस यांनी स्वतः जातीने लक्ष देत रात्रंदिवस नियोजनात मोलाचे सहकार्य केले. प्रशासन, देवस्थान समिती आणि स्वयंसेवक यांच्याशी सातत्याने समन्वय साधून त्यांनी व्यवस्थापन अधिक सक्षम केले. त्यांच्या सक्रिय सहभागामुळे भाविकांना कोणताही त्रास न होता सुलभ दर्शन घेता आले.

### हजारो हातांनी केले मोफत अन्नदान

■ गडावर आलेल्या लाखो भाविकांच्या महाप्रसादाची सोय नाथांचे भक्त आणि विविध सामाजिक संघटनांच्या वतीने मोफत करण्यात आली होती. 'कुणीही भक्त उपाशी राहू नये' या भावनेतून रात्रभर अन्नदानाचे कार्य सुरू होते. आपल्याला या बातमीत काही बदल करून हवा असल्यास नक्की सांगा. मी ती अधिक सुधारून देऊ शकतो.





# निसर्गसंवर्धन आणि सामाजिक बांधिलकीचा सुरेख संगम!

## आष्टीतील शाहू महाराज मूकबधिर विद्यालयात चिमुकल्यांच्या हस्ते वृक्षारोपण; दिव्यांगांसोबत साजरा केला गुढीपाडवा

■ आष्टी (प्रतिनिधी)

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर आष्टी शहरात एक अत्यंत स्तुत्य आणि प्रेरणादायी उपक्रम पार पडला. येथील शाहू महाराज अपंग व मूकबधिर विद्यालयाच्या आवारात निसर्गसंवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण करण्यात आले. विशेष म्हणजे, या सामाजिक कार्यात चिमुकल्या हातांनीही सक्रिय सहभाग नोंदवल्याने शहरात या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शाहू महाराज अपंग व मूकबधिर विद्यालयाच्या विस्तीर्ण आवारात संस्थाध्यक्ष सुखदेव पोकळे आणि ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांच्या मार्गदर्शनाखाली हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला.यावेळी रियांश आणि अदिराज या चिमुकल्या बालकांच्या हस्ते पहिली रोपे लावण्यात आली. लहान वयातच मुलांमध्ये निसर्गाविषयी प्रेम आणि संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी,या उद्देशाने त्यांना या मोहिमेत सामावून घेण्यात आले होते. विद्यालयाच्या आवारात ३ बाय ३ फूट अंतराची शिस्तबद्ध आखणी करून विविध जातींच्या फुलांची आणि फळझाडांची लागवड करण्यात आली.

### दिव्यांग विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलला आनंद

हे विद्यालय आष्टी तालुक्यातील 'शाहू महाराज बहुउद्देशीय सेवाभावी व शिक्षण प्रसारक मंडळ' संचलित असून, येथे केंद्र शासन पुरस्कृत अपंग पुनर्वसन केंद्र यशस्वीपणे चालवले जाते. हिंदू नववर्षाच्या म्हणजेच गुढीपाडव्याच्या सणाचे औचित्य साधून या केंद्रातील सर्व दिव्यांग मुलांना विशेष खाऊचे वाटप करण्यात आले. सणाच्या दिवशी मिळालेल्या या प्रेमामुळे आणि गोडव्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद पाहायला मिळाला.

या प्रेरणादायी कार्यक्रमासाठी छत्रपती शाहू महाराज अपंग विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय झांजे, शाहू महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक काकासाहेब थोरवे, अमोल थोरवे, आदिनाथ दळवी, तसेच मुख्याध्यापक काशीद आणि गांधले आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या अनोख्या उपक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या उत्साहाने उपस्थित होते. वृक्षारोपण आणि दिव्यांग विद्यार्थ्यांप्रती दाखवलेली ही कृतज्ञता समाजासाठी एक आदर्श उदाहरण ठरत आहे.

# बारा गाड्या,एक गाडा ओढण्याची कानडी गावची आगळी वेगळी शंभर वर्षाची परंपरा

## चौरे कुटुंबातील तिसरी पिढी करतेय नवसाची पूर्ती

■ सिरसाळा अतुल बडे :

परळी तालुक्यातील सिरसाळा नजीक असलेल्या कानडी येथे गुढीपाडव्याच्या दिवशी बैलगाड्या ओढून भक्ती व शक्तीचे प्रदर्शन करत पाडवा साजरा केला केला जातो.

चौरे कुटुंबाने केलेल्या नवसाने सुरु झालेली हि परंपरा शंभर वर्षांनंतर तिसरी पिढी निभावत आहे.विशेष म्हणजे हि परपंरा केवळ चौरे कुटुंबाची मर्यादित नसुन अख्खे कानडी गावकऱ्यांची आहे.दरवर्षी गुढीपाडव्याला मोठ्या भक्ती भावने गावातील तरुण,महिला - पुरुष,अबाल-वृद्ध ह्या पारंपरिक उत्सवात सहभागी असतात . गावात प्रत्येक जण आपापल्या घराला तोरण बांधतो,शेरणी वाटतो, हनुमान मंदिर नारळ फोडतो आणि पाडव्यापासुन सप्ताह आयोजित केला जातो. ह्या सप्ताहात सात दिवस पारायणाने गावात भक्तीमय वातावरण निर्माण होते. ह्या परंपरेत गाड्या ओढण्याचा विशेषत परंपरेचा भाग आहे. गाव शिवारा पासुन गावच्या वेशीपर्यंत एकमेकास जोडलेल्या बारा बैलगाड्या व त्यास जोडलेला एक गाडा अशा तेरा गाड्या चौरे कुटुंबातील मानकरी असलेला एकटा वक्ती ओढतो. बैलगाड्या ओढण्याचा क्षण कानडी गावक-यासाठी महत्वाचा आहे. ह्या रिकाम्या बैलगाड्यात गावातील ग्रामस्थ,तरुण बसत देवच्या नावाचा जयघोष करतात. गाड्या ओढून आल्यावर गाड्या ओढणाऱ्या वक्तीचे औक्षण केले जाते. हनुमान मंदिरात जाऊन देवाचे दर्शन घेऊन परंपरा पार पाडली जाते.

### शंभर वर्षांपुर्वी चौरे कुटुंबाने केला होता नवस

■ शंभर वर्षांपुर्वी चौरे कुटुंबाने देव हनुमानास एक नवस केला होता , त्या नवसाला यश आले म्हणुन सद्याचे गाडी ओढणारे चौरे कुटुंबातील मानकरी सुमंत हनुमंत चौरे यांच्या आजोबांनी गुढीपाडव्यापाच्या दिवशी बारा बैलगाड्या व एक गाडा ओढणे,गावात शेरणी वाटणे,तोरण बांधने हि परंपरा सुरु केली. चौरे कुटुंबाने सुरु केलेली हि परंपरा अख्खे कानडी गाव मोठ्या भक्ती भावाने निभावते आहे.अशी माहिती येथील सामाजिक कार्यकर्ते नितीन कदम यांनी दिली आहे.



# वंचित बहुजन आघाडीच्या रास्ता रोको आंदोलनास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे : संतोष वसंत व्हावळे

■ परळी प्रतिनिधी

परळी विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता, राख उपयोगिता मुजोर अधिकारी व संबंधित कर्मचारी यांनी राखेच्या टेंडर प्रक्रियेमध्ये प्रचंड भ्रष्टाचार करून करोडो रुपयांची राख नाममात्र पैशावर दाऊतपूर ग्रामपंचायतला कशामुळे दिली? एवढी सोपी गोष्ट समजायला परळीची जनता काय वेडी राहिलेली नाही. 2023 मध्ये प्रति टन 353 रुपये भाव असताना 2026 मध्ये फक्त 177 रुपयांमध्ये प्रति टन राख देऊन वरील संबंधित अधिकाऱ्याने प्रचंड मोठा भ्रष्टाचार केलेला आहे. आमचे नेते मिलिंद घाडगे यांनी या भ्रष्टाचाराच्या विरोधामध्ये राख टेंडर प्रक्रिया च्या चुकीच्या पद्धतीवर निवेदन दिल्यामुळे विद्युत केंद्राच्या मुख्य अभियंताने टेंडर पद्धत सार्वजनिक केल्यामुळे हाच राखेचा 60 टक्के टेंडर



प्रक्रियेचा लिलाव दिनांक 17 /03/2026 रोजी झाला असता याच राखेचा रेट प्रति टन 1921 रुपये झाला आहे याचा अर्थ या भ्रष्टाचारी मुख्य अभियंत्याने व संबंधित अधिकाऱ्याने दाऊतपूर ग्रामपंचायतला 177 रुपये प्रमाणे दिल्यामुळे 100 ते 150 करोडो रुपयाचा शासनाचा महसूल बुडाला आहे.

तर ग्रामपंचायत दाऊतपूरला जवळपास 400 ते 500 कोटी रुपयांचा फायदा आजच्या बाजारभावाप्रमाणे या मुख्य अभियंत्याने करून दिला आहे याची सखोल चौकशी करून दाऊतपूर ग्रामपंचायत असेल किंवा वीज विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता अधिकारी कर्मचारी असतील यांच्याकडून हा महसूल वसूल करून यांना तात्काळ निलंबित करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने दिनांक 20 /3 /2026 रोजी सकाळी 10.00 वाजता परळी येथील छत्रपती संभाजी चौक (ईटके कॉर्नर) परळी वै. येथे प्रचंड रास्ता रोको आंदोलन ठेवले आहे. तरी सर्व सुजाण नागरिकांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन वंचित बहुजन आघाडी युवा तालुका उपाध्यक्ष संतोष वसंत व्हावळे यांनी केले आहे.

# सामाजिक कार्यकर्ते आयु . यश पंचशीला अरुण बनसोडे यांना "नालंदा फाउंडेशनचा राज्यस्तरीय कर्तुत्व गौरव पुरस्कार-२०२६ जाहीर ..!"

■ परळी (प्रतिनिधी )

परळी तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते तथा युवक नेते, आयु. यश पंचशीला अरुण बनसोडे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन नालंदा फाउंडेशनचा "नालंदा कर्तुत्व राज्यस्तरीय गौरव पुरस्कार-२०२६" जाहीर करण्यात आला आहे. यश (भैय्या) बनसोडे यांनी स्मृतीशेष आयु. विजयकुमारजी गंडले प्रतिष्ठाण, व पंचशीला प्रतिष्ठाणच्या माध्यमातून परळी तालुक्यामध्ये गेल्या अनेक वर्षापासून गरजवंत रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरविणे, तसेच सरकारी दवाखान्यांमध्ये अन्नदान व फळे वाटप करणे, तसेच निराधार व बेघर भिक्षेकरुंना ब्लँकेट वाटप करणे, तसेच घाटनांदुर येथील वृद्धाश्रमास अन्नदान करणे व परळी तालुक्यातील अनेक शैक्षणिक संस्थांना, अंगणवाडी व शाळांमध्ये शैक्षणिक साहित्याचे



वाटप करणे इत्यादी सामाजिक उपक्रम ते सातत्याने अविरतपणे राबवत असतात. आणि या कार्यासाठी त्यांचे (माता-पिता) स्मृतीशेष, आयु. पंचशीला अरुण बनसोडे आणि (मामा) स्मृतीशेष, आयु. विजयकुमारजी गंडले (साहेब) यांच्याकडून त्यांना सामाजिक कार्याची प्रेरणा मिळालेली आहे.

यश (भैय्या) बनसोडे यांनी केलेल्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेऊन नालंदा फाउंडेशन महाराष्ट्र राज्याच्या वतीने या प्रतिष्ठेच्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी आयु. यश पंचशीला अरुण बनसोडे यांची निवड करण्यात आलेली आहे. हा पुरस्कार सोहळा शनिवार, दि. २१ मार्च २०२६ रोजी पुणे येथील पत्रकार भवन, नवी पेठ, (पुणे) येथे संपन्न होणार असून या सोहळ्यासाठी मा. नितीन धवणे (पाटील) (राष्ट्रीय अध्यक्ष: मराठी चित्रपट असोसिएशन) यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा संपन्न होणार आहे. तर प्रमुख उपस्थिती म्हणून मा. डॉ. नीताताई जोशी (प्रसिद्ध शास्त्रज्ञ), विशेषकार्य: कृत्रिम पावसावर संशोधन, मा. प्रा. डॉ. संदीप सांगळे (अध्यक्ष: मराठी अभ्यास मंडळ), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मा. डॉ. राजेंद्र सिंग वालिया (माजी सैनिक) भारतीय सेना, ह्युमन राइट्स कौन्सिल ऑफ इंडिया उपप्रमुख, राष्ट्रीय समिती: अँटी करप्शन अँड क्राईम कंट्रोल फोर्स, व कु. आर्या (दीदी) घारे. (देऊळ बंद मराठी चित्रपटातील बालकलाकार, चिमुकली अभिनेत्री) इत्यादी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.